-: प्रेसनोट :- दि. ०२/०३/२०२१

यातील फिर्यादी हे पोलीस वाहतुक विभागात अंमलदार असुन त्यांचे दहा महिन्याचे थकीत वेतनाची मंजुर झालेली रक्कम फिर्यादीस देण्यात आली होती, त्यांचा मोबदला म्हणुन यातील आरोपीताने फिर्यादीकडे रु.१,००,०००/- रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.६०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०९/२०२१ |
| कलम | ७, भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | सचिन आत्माराम नडे हि. ४१ वर्षे वरिष्ठ लिपीक (रजा कक्ष), मुंबई वाहतुक मुख्यालय, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ६०,०००/- |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे वाहतुक विभाग येथे पोलीस अंमलदार असुन त्यांना गंभीर आजार झाला असल्याने ते ४७६ दिवस वैद्यकिय रजेवर होते. फिर्यादी यांचे सदर वैद्यकीय कालावधी मधील १० महिन्याचे वेतन रोखण्यात आले होते. सदर वेतन पारित करण्याकरीता आरोपीत लोकसेवकाने फिर्यादीकडे रू. १,००,०००/- इतकी लाचेची रक्कम मागणी केली होती. सदर १० महिन्याचे वेतन पारित केल्यानंतर केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन मागणी केलेली रक्कम रू. १,००,०००/- देण्यास यातील फिर्यादीस विलंब झाला. म्हणुन यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादीचे सेवापुस्तक आरोपी लोकसेवकाच्या ताब्यात असून फिर्यादीने लाचेची रक्कम न दिल्यास त्यांना अदा करण्यात आलेल्या वेतनाची संपुर्ण वसुली करण्यात येईल अशी भिती फिर्यादीस दाखवली.<br>फिर्यादीस आरोपीत लोकसेवकास लाच दयावयाची नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. ०२/०३/२०२१ रोजी प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>दि.०२/०३/२०२१ रोजी फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांना पारित केलेल्या १० महिन्याचे थकीत वेतनाचा मोबदला म्हणून रु.७०,०००/- इतक्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू. ६०,०००/- रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन आज दि. ०२/०३/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवकाने रु. ६०,०००/- लाचेची रक्कम फिर्यादीकडून स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

ASSTT. COMMISSIONER OF POLICE, ANTI-CORRUPTION BUREAU, MUMBAI
सत्यमेव जयते

अलका देशमुख २/३

( अलका स. देशमुख)
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ-acbmaharastra.gov.in
ईमेल- १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००